

# एआय टूर!

सुधीर कावळे

मला वाटतं, आपला केरलम टूर आताच ठरवायला हवा.. सतीश राजेशला म्हणाला.

हो. उद्या २६ जानेवारी. सगळ्यांना सुट्टी आहे. आपण तुझ्या घरी बसू.

दोघांचं एकमत झालं. तू संदीपला कळव. मी अजितला फोन करतो. इति राजेश..

२६ तारीख उजाडली. संध्याकाळचे चार वाजले. ठरल्याप्रमाणे राजेशकडे चौघे जमले. राजेश म्हणाला, आपल्याबरोबर रवीसुद्धा येणार आहे. तेवढ्यात रवी आलाच.

केरलमला कधी जायचं, किती दिवस अशी चर्चा सुरू असताना राजेश म्हणाला, आपले आपण प्लॅन करू. पण त्या जोडीला एआयची मदत घेतली तर..

हो. तुला अशा कृत्रिम बुद्धिमत्तेची गरज लागणारच, रवीने टोला हाणल्यावर सगळे हसून एकमेकांना टाळ्या देऊ लागले.

अशाप्रकारचा टूर ठरवताना आपल्याला कुठे जायचे, काय पाहायचे, जवळचे राहण्याचे ठिकाण, हॉटेल कोणते हे एआयला काय समजणार? सतीशने शंका उपस्थित केली.

आणि आपण ट्रेनने जावं की फ्लाईट सोयीची हा निर्णय एआय कसा घेणार? रवीनेही सतीशच्या सुरात सूर मिसळला.

अरे, तुम्ही एवढे चांगले शिकलेले, तुमच्या तुमच्या ऑफिसात संगणकावर काम करता. घरात मुलेही सफाईदारपणे संगणक वापरतात आणि तुम्ही एआयबद्दल काही माहिती नसल्यासारखं बोलावं याचं मला आश्चर्य वाटतंय, राजेशने आपलं मत स्पष्टपणे मांडलं..

राजेश पुढे सांगायला लागला, आमच्या कंपनीचा तर व्यवसायच आयटीचा. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीचा. आमच्या कंपनीतून माझ्यासह किती मुलं जगभरात जाऊन आली. प्रोग्रामिंग किंवा इतर सेवा देऊन आली. पण आता आमच्या कंपनीचा बिझिनेस कमी व्हायला लागला आहे. का माहितीये? या एआयमुळे. आमची मुलं जी काही प्रोग्रामिंग करून देण्यासाठी परदेशात जायची, ते तंत्रज्ञान आता बाबा आदमच्या जमान्याचं वाटावं एवढं जुनं झालंय. अमेरिकेतील एनव्हीडीया, अँथ्रोपिक आणि इतर कंपन्यांनी असं तंत्रज्ञान विकसित केलंय की, आपण भारतीय जी सेवा द्यायचो त्या सेवा हे एआयचं तंत्रज्ञान स्वतःच तयार करतं, त्यात आवश्यक ते बदलही करतं. त्यामुळे निव्वळ सेवा पुरवणारे उद्योग धोक्यात आले आहेत.

सतीश म्हणाला, म्हणजे या नव्या बदलाकडे आपल्याला लक्ष द्यावं लागणार.

**राजेश :** खरं तर आता फार उशीर होऊन गेलाय.. एआयने काय क्रांती केलीय हे तुम्हाला पाह्यचंय? असं म्हणून त्याने लॅपटॉपवर एक ओपन एआय साईट सुरू केली. तो म्हणाला, ही साईट ओपन एआय आहे. म्हणजे कोणीही ती मोफत वापरू शकतं. आज तरी.

त्याने 'प्रॉम्प्ट' टाकला : आम्ही पाच मित्र केरलम ट्रीपचं नियोजन करत आहोत. तुमचं काय सहकार्य होऊ शकेल.

अक्षरश: पुढच्या क्षणाला एआयने सांगितलं. तुमच्याकडे किती दिवस आहेत आणि तुम्ही कोठून निघणार ते सांगितल्यास मी तुम्हाला प्रवासाची योजना आखून देऊ शकेल.

राजेशने पुढचा प्रॉम्प्ट दिला. आमच्याकडे बारा ते पंधरा दिवस आहेत. आम्ही नाशिकहून निघणार आहोत.

एआयने लागेच विचारलं, केरलममध्ये अनेक मंदिरे आणि बरीच प्रेक्षणीय स्थळे आहेत. तुमचे प्राधान्य कशाला असेल?

सगळ्यांनी एकमेकांकडे पाहिलं. दोन नास्तिक मजा करायला निघालेले. दोघांना मंदिरांत पण इंटरेस्ट होता. एकाला काहीही चालणार होते.

राजेशने प्रॉम्प्ट टाकला. दोन्हींचं मिश्रण करून कृपया सांगा.

अर्धा मिनीट गेला नसेल तोच, एआयने संपूर्ण दौऱ्याची आखणीच सुचवून समोर ठेवली.

प्रथम तुम्ही केरळची राजधानी असलेल्या थिरुवनंतपूरम येथे पद्मनाभस्वामी मंदिरात दर्शन घ्यावे. तेथून केरलममध्ये नसले तरी तामिळनाडूत तुम्ही विवेकानंद स्मारकास भेट देऊ शकता. तेथील सूर्यास्त पाहून मुक्काम करावा. नंतर पुन्हा केरलममध्ये येऊन टेकडी या निसर्गरम्य ठिकाणी तुम्ही भेट द्यावी. तेथील प्रसिद्ध ठिकाणांबद्दल तुम्हाला आवश्यकता असल्यास मी स्वतंत्र माहिती देईन शिवाय कोची, तेथील वॉटर मेट्रो, मुन्नार टेकड्या आणि बॅकवॉटर्स हेदेखील